


महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३० अ/ ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुबई -४०० ००५

दूरध्वनी क्र - ०२२-२२१६३३५१ ई-मेल - pmu@mahapocra.gov.in


नस्ती क्र. NDKSP-12041(29)/24/2025-O/O ADM-NDKSP/2765771 दि. २५/११/२०२५

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पातील समाविष्ट सर्व २१ जिल्हे)

**विषय :- बाह्ययंत्रणेव्दारे नियुक्त केलेल्या समूह सहायकांना गाव समूह वाटप करण्याबाबत मार्गदर्शक सूचना -**

कृषि व पदुम विभागाच्या दि.०५.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प टप्पा-२ च्या अंमलबजावणीसाठी १२५७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापैकी १०८५ मनुष्यबळ सेवा नेमण्याकरिता जागतिक बँकेच्या प्रापण प्रक्रियेनुसार टि अ‍ॅण्ड एम सर्व्हिसेस प्रा.लि. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. टि अ‍ॅण्ड एम सर्व्हिसेस प्रा.लि. या बाह्ययंत्रणेने जाहिराती देऊन, समूह सहायक पदासाठी ऑनलाईन अर्ज मागविले होते. सदर अर्जांची छाननी करुन, उमेदवारांना जाहिरातीमध्ये नमूद किमान शैक्षणिक अर्हतमध्ये प्राप्त झालेले गुणांची टक्केवारी, प्रकल्प टप्पा १ मध्ये काम केल्याचा अनुभव, शासकीय व निमशासकीय कामाचा अनुभव व पदव्युत्तर पदवी या आधारे समूह सहायकांची अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द केली आहे व त्यांना नियुक्ती पत्र निर्गमित केले आहेत. बाह्ययंत्रणेव्दारे नियुक्त केलेल्या समूह सहायकांची गुणवत्ता यादी प्रपत्र-१ (उमेदवारांचा संपर्क क्रमांक व ईमेल सह) येथे जोडण्यात आली आहे. तसेच, आपल्या जिल्ह्यातील गाव समूहाची यादी प्रपत्र-२ येथे जोडण्यात आली आहे. आपल्या जिल्ह्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समूह सहायकांना समुपदेशनाव्दारे गाव समूह नेमून देण्याची जबाबदारी आपल्यावर सोपविण्यात येत आहे. त्यासाठी खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१) आपल्या जिल्ह्यामध्ये नियुक्तीपत्र घेऊन हजर होणाऱ्या उमेदवाराची ओळख पटवून, त्यांना जिल्हा स्तरावर रुजू करुन घ्यावे.

२) आपल्या जिल्ह्यात नियुक्त करण्यात आलेल्या समूह सहायकांना लवकरात लवकर व हे पत्र निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आंत एका ठराविक दिवशी व ठराविक वेळी समुपदेशन करण्यासाठी ई मेल पाठवून, एकत्र बोलाविण्यात यावे.

३) सर्व उपस्थित उमेदवारांना आपल्या जिल्ह्यातील गाव समूहाची यादी, नकाशासह दाखविण्यात यावे.

४) प्रथम सर्व महिला व दिव्यांग उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता यादीनुसार क्रमाने गाव समूह वाटप करण्यात यावे.

५) सर्व महिला व दिव्यांग उमेदवारांना गाव समूह वाटप केल्यानंतर, शिल्लक राहिलेले गाव समूह उर्वरित उमेदवारांना गुणवत्ता यादीनुसार वाटप करण्यात यावे.

६) उमेदवार राहत असलेले गावाचे गाव समूह हे त्या उमेदवारांना वाटप करण्यात येऊ नये. तथापि, सदर अट ही महिला व दिव्यांग उमेदवारांना लागू असणार नाही.

७) सर्व उमेदवारांना सर्व प्रक्रियेबाबत स्पष्ट सूचना देण्यात यावी. तसेच, समुपदेशनाव्दारे गाव समूहाचे वरील तत्त्वानुसार वाटप करण्यात यावे. गाव समूह वाटपामध्ये कोणाचीही तक्रार येणार नाही, याची काळजी घ्यावी.

८) एकदा गाव समूह वाटप झाल्यानंतर, त्यामध्ये बदल करण्यात येणार नाही, याचीही सर्व उमेदवारांना स्पष्ट सूचना देण्यात यावी.

३. ज्या दिवशी समुपदेशनाद्वारे समूह सहायकांना गाव समूहाचे वाटप करण्यात येणार आहे, त्या दिवसाचे इतिवृत्त जतन करुन ठेवण्यात यावे. बाह्ययंत्रणेव्दारे समूह सहायक पदासाठी गुणवत्तेप्रमाणे जिल्हावाटप करण्यात आले आहे. त्यामुळे समूह सहायकांना जो जिल्हा वाटप झाला आहे, त्यामध्ये बदल करता येणार नाही. त्यामुळे आपल्या जिल्ह्यात ज्या समूह सहायकांचे वाटप झाले आहे, केवळ त्याच उमेदवारांना रुजू करुन घ्यावे. समूह सहायकांना गाव समूहाचे वाटप झाल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये.

Parimal 25/11/25

(परिमल सिंह)

प्रकल्प संचालक

प्रत: माहितीसाठी,

१) विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पातील समाविष्ट सर्व ५ विभाग)

२) उप विभागीय कृषि अधिकारी (प्रकल्पातील समाविष्ट सर्व ५५ उपविभाग)